मुंबई विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण विभाग

क्र.वि.क/05/२०१७

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक :

विषय : दिनांक १ जुलै ते ७ जुलै या कालावधीमध्ये ४ कोटी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालये/संस्था/विभाग यांच्या सहभागाबाबत.

संदर्भ : वित्त आणि नियोजन, वने विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२, पत्र क्र.साववि -२०१६/प्र.क्र.१८०/फ-११.

महोदय,

वर्ष २०१६ आणि हया वर्षातील एप्रिल महिना आधुनिक हवामान नोंदीप्रमाणे गेल्या १३७ वर्षाच्या इतिहासातील दुस-या क्रमांकाचा सर्वाधिक उष्ण महिना ठरला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये २०१७, २०१८ व २०१९ हया वर्षात अनुक्रमे ४ कोटी, १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवड करण्याचे नियोजित आहे. वृक्ष लागवडीचा कालावधी प्रत्येक वर्षी १ जुलै ते ७ जुलै असा राहणार आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : सावर्व -२०१६/प्र.क्र.१८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये यांच्या परिसरामध्ये आणि त्यांच्याकडील मोकळया जागांवर वृक्षारोपणाचे उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले आहे.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये NSS, NCC, स्काऊट आणि गाईड अंतर्गत मोठया प्रमाणात विद्यार्थी सहभागी आहेत. हे विद्यार्थी प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रमाच्या वेळी विविध भागात आणि स्वयंसेवी संस्था व अंमलबजावणी यंत्रणांना स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास पुढे आल्यास सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यास मदत होईल. त्यातून तरूण व संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना वृक्ष, वन, पर्यावरण, वन्यजीव, जैवविविधता आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्राबाबत आस्था, प्रेम व जिव्हाळा निर्माण होईल. त्यातून पर्यावरण सुरक्षितता, संरक्षण व संवर्धन यामध्ये मोलाची मदत होईल.

नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रूपांतरीत करून यशस्वीरीत्या राबविण्यासाठी मोठया प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी **"महाराष्ट्र हरीत सेना"** स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक १५.०६.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी, स्वयंस्फुर्तीने, स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे व त्यानंतर प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर किंवा एसएमएस वर पाठविले जाते.

कृपया मागे पहा...